Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजार
आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर
पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

क्र.रामं/परीक्षा-२/२४१४
दिनांक -३०/०३/२०२०

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे

विषय:-फेब्रुवारी-मार्च २०२० माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिका शिक्षकांना घरी तपासणीसाठी देणेबाबत..

संदर्भ - १. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा-२/२२९७ दिनांक १८/०३/२०२० चे पत्र.
२. क्र.रामं/परीक्षा-२/२३८१, दिनांक २३/०३/२०२० चे पत्र.
३. शासनाकडून प्राप्त झालेला दिनांक २३/०३/२०२० रोजीचा ई-मेल.
४. या कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा-२/२४०६, दिनांक २३/०३/२०२० चे पत्र.
५. शासनाचे क्र. संकीर्ण -२०२०/प्र.क्र.६०/एसडी-२ दिनांक २७/०३/२०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२० उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा दि.१८ फेब्रुवारी २०२० ते दि.१८ मार्च २०२० या कालावधीत व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा दि. ३ मार्च २०२० ते २३ मार्च २०२० या कालावधीत आयोजित करण्यात आलेली होती.

मात्र राज्यात कोरोना आजाराच्या प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना सुट्टी देण्यात आलेली आहे. त्यामुळे शाळेत येऊन उत्तरपत्रिकांचे परीक्षण व नियमन करण्यात अडचणी येत असल्याने खास बाब म्हणून केवळ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका अटी व शर्तीच्या अधिन राहून माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना परिक्षण व नियमनासाठी घरी देण्याचे संदर्भिय ४ च्या पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.

तसेच इयत्ता १०वीचा भूगोल या विषयाचा पेपर घेण्याबाबतचा तपशील दिनांक ३१ मार्च २०२० नंतर जाहीर करण्यात येईल असे कळविण्यात आलेले होते. तसेच इयत्ता १० वी १२ वी परीक्षेनंतर उत्तरपत्रिका परीक्षण व नियमनासाठी त्यांचे घरी देण्यासंदर्भात मुभा देण्यात आली होती.

तथापि, राज्यात दि.१४/०४/२०२० पर्यंत Lockdown घोषित केलेला असल्याने संदर्भिय क्र.५ च्या शासन पत्रानुसार इयत्ता १०वीचा भूगोल या विषयाचा पेपर घेण्याबाबत दिनांक १५ एप्रिल, २०२० नंतर निर्णय घेण्यात येईल. तसेच इयत्ता १०वी १२वी परीक्षेनंतर उत्तरपत्रिका तपासणी संदर्भात परीक्षकांना Lockdown शिथिल झाल्यानंतर मुख्याध्यापकांकडून उत्तर तपासणीसाठी घरी घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. असे कळविलेले आहे.

त्याअनुषंगाने विभागीय मंडळ स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, व दि. १४ एप्रिल,२०२० नंतर परीक्षण व नियमनाबाबतचे विषयनिहाय सुधारित वेळापत्रक संबंधितांना कळविण्यात यावे.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/3687
कोल्हापूर 416004
दिनांक 31/03/2020

प्रति,

सर्व मुख्याध्यापक
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक विद्यालये,
सातारा /सांगली / कोल्हापूर.

उपरोक्त पत्राची नोंद घेऊन आपल्या अधिनस्थ सर्व नियामक व परीक्षक यांना अवगत करुन आपल्या स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच उत्तरपत्रिका परीक्षण व नियमनाबाबतचे विषय निहाय सुधारित वेळापत्रक दिनांक 14 एप्रिल 2020 नंतर कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

31/03/2020

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-416004